महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । महाराष्ट्र
शनिवार दि.१४ फेब्रुवारी २०२६
वर्ष ५ वे । अंक ३१४
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

। RNI/MAHMAR/2021/80074 । Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 । https://marathwadapatra.com । https://epaper.marathwadapatra.com











## ग्रामीण भागात उद्योजक घडावेत यासाठी...

# पशुपालनाला कृषीचा दर्जा-ना.पंकजा मुंडे

परळी । प्रतिनिधी

**पशुपालनास कृषीचा दर्जा देण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे कृषी च्या दराने कर्ज पुरवठा करण्यासोबत पशु पालनासाठी ५० टक्के अनुदान देखील दिले जाणार आहे त्यामुळे या क्षेत्रात मोठया प्रमाणात ग्रामीण उद्योजक तयार होतील आणि यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन पशु संवर्धन तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी परळी येथील भव्य अशा महा पशुधन एक्सपो २०२६ च्या उद्घाटन प्रसंगी केले.**



- ३८ एकर क्षेत्रात विविध स्टॉलची मांडणी
- ३ दिवस चालणार पशुपक्षी प्रदर्शन
- शनिवारी मुख्यमंत्री करणार पाहणी

परळी येथील अंबाजोगाई मार्गालगत असणा-या ओपळे मैदान येथे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. भव्य अशा ३८ एकर मैदानात होणारे हे प्रदर्शन १५ फेब्रुवारी पर्यंत चालणार आहे. उद्घाटन प्रसंगी परळीचे आमदार धनंजय मुंडे, पशुसंवर्धन सचिव डॉ. एन. रामा स्वामी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पशुसंवर्धन आयुक्त प्रविण देवरे तसेच परळीच्या नगरध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी आदींची प्रमुख उपस्थिती होती. आरंभी प्रदर्शन स्थळी फित कापून व गौपूजन करुन सुरुवात झाली त्यानंतर औपचारिक उद्घाटन सोहळा दीप प्रज्ज्वलन करुन पार पडला यावेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन तसेच स्व. गोपीनाथ मुंडे आणि स्व. अजित पवार यांना ▶▶ पान २ वर

### देशभरातुन पशू

या प्रदर्शनासाठी देशातील विविध भागातील पशुधन येथे आणले आहे. या ठिकाणी देशातली सर्वात छोटी गाय तसेच विविध प्रजातींच्या गायी, बैल, घोडे आणि बकरे यांच्यासह विविध पक्षी विस्तीर्ण दालनांमध्ये ठेवण्यात आले आहेत.

## थोडक्यात

### लाडक्या बहिणींमुळे एसटी महामंडळाचे अच्छे दिन

मुंबई । वृत्तसेवा

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेनंतर सरकारने महिलांसाठी अनेक योजना राबवल्या आहेत. एसटी महामंडळानेही महिलांसाठी खास योजना राबवली आहे. एसटीमधून महिलांना हाफ तिकीट दरात प्रवास करता येणार आहे. तिकीट दरात ५० टक्क्यांची सवलत दिली आहे. विधानसभा निवडणुकीआधी ही घोषणा केली होती. यामुळे निवडणुकीत खूप फायदा झाला आहे. तिकीट दरात ५० टक्क्यांची सवलत देण्यासाठी राज्य सरकारने ३५ महिन्यात तब्बल ८० कोटी रुपये मोजले आहेत. मात्र, या योजनेमुळे परिवहन मंडळाची स्थिती सुधारली आहे. महिलांनी प्रवास करण्याची संख्या वाढली आहे. राज्य परिवहन विभागाच्या ताफ्यात दरवर्षी दोन हजार नवीन गाड्या दाखल होत आहेत. जुन्या बस नसल्याने आता अनेक प्रवासी ▶▶ पान २ वर

### गुन्हा दाखल होण्यापूर्वीच अटकपूर्व जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी



कर्नाटक मधून गुजरात कडे तांदळाने भरलेला ट्रक हॉटेल बळीराजा मंजरी फाटा येथे पलटी झाला होता सदरील ट्रक मधील तांदूळ हा शासकीय गोदामातील असल्याचा संशय ग्रामीण पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना आल्याने संबंधी येथे तपासणीसाठी पाठवण्यात आला होता. सदरचा तांदूळ चा रिपोर्ट हा निल आला तरी बीड ग्रामीण पोलीस स्टेशन हे गुन्हा दाखल करण्याच्या तयारीत होते, दरम्यानच्या काळात ट्रक अथवा तांदूळ दोन्हीही गोष्टी तपासणीचा रिपोर्ट येईपर्यंत पोलीस मुख्यालयात जमा होता. चार महिन्यापासून ताब्यात असलेला ट्रक व तांदूळ पोलीस निरीक्षक बीड ग्रामीण यांनी सोडला नसल्याने ट्रक मालकाला पर्याय ▶▶ पान २ वर

# माजलगाव येथे अवैध वाळू उपसा

माजलगाव । प्रतिनिधी

### महसूल विभाग व पोलीस प्रशासनांचे संशयास्पद दुर्लक्ष



बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात अवैध वाळू उपसा पुन्हा एकदा डोके वर काढताना दिसत असून महसूल विभाग व पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गोदावरी खोऱ्यातील नदीपात्रांमधून रात्रीच्या अंधारात मोठ्या प्रमाणावर वाळूची चोरी सुरू असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे. मात्र संबंधित यंत्रणा या प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, नदीकाठावरील गावांमध्ये मध्यरात्रीनंतर पोकलँड मशिन्स व ट्रॅक्टरच्या साहाय्याने वाळू उपसा केला जातो. पहाटेपर्यंत डझनभर वाहने वाळू भरून बाहेर पडतात. या वाहनांवर कोणतीही अधिकृत परवानगी किंवा वाहतूक चलन नसतानाही त्यांची मुक्तपणे वाहतूक सुरू असल्याचे दिसून येते. यामुळे शासनाला लाखो रुपयांचा महसूल तोटा सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, अवैध वाळू उपशामुळे नदीपात्र खोल होत असून परिसरातील शेती, विहिरी आणि पाण्याच्या स्रोतांवर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. अनेक ठिकाणी नदीकाठाची धूप वाढली असून पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका बळावला आहे. पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, नियोजनशून्य आणि अतिरेकी वाळू उपसा केल्यास जलसाखळी विस्कळीत होऊन भविष्यात पाण्याची टंचाई निर्माण होऊ शकते. ▶▶ पान २ वर

## स्वा.रा.ती.रुग्णालयातील बाह्यरुग्ण

# चिठ्ठी विभागात गोंधळ



अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ (स्वा. रा. ती.) ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथील बाह्यरुग्ण (ओपीडी) चिठ्ठी विभागात सुट्ट्या पैशांच्या कारणावरून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. वीस रुपयांची ओपीडी चिठ्ठी काढण्यासाठी रुग्ण नातेवाईकांनी शंभर किंवा पन्नास रुपयांची नोट दिल्यास संबंधित कर्मचारी सुट्टे पैसे देण्यास नकार देत असल्याची तक्रार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुट्टे नाहीत, नंतर या असे सांगून रुग्णांना परत पाठवले जाते. मात्र तपासणी पूर्ण होईपर्यंत संबंधित कर्मचारी ड्युटी संपवून निघून जातात. परिणामी, रुग्ण नातेवाईकांना दिलेल्या रकमेचे उर्वरित पैसे मिळत नाहीत. अनेक वेळा रुग्णांची तपासणी, औषधोपचार व इतर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चिठ्ठी विभागातील कर्मचारी उपलब्ध नसल्याने रुग्णांना आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याचा आरोप आहे. गरीब, शेतकरी व ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांसाठी वीस-तीस रुपयेही महत्त्वाचे असतात. अशा परिस्थितीत सुट्ट्या पैशांच्या कारणावरून होणारी ही अडवणूक म्हणजे आर्थिक पिळवणूकच असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. रुग्णालय प्रशासनाने या प्रकाराची तात्काळ दखल घेऊन संबंधित विभागात पारदर्शक व्यवस्था निर्माण करावी, सुट्ट्या पैशांची स्वतंत्र सोय करावी किंवा डिजिटल पेमेंटची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे. शासकीय रुग्णालय हे सर्वसामान्यांचे आधारस्थान असताना ▶▶ पान २ वर

# खळवट निमगाव येथे मध्यरात्री सशस्त्र दरोडा

बीड । प्रतिनिधी

बीडच्या खळवट लिमगाव गावात धाडसी दरोडाचा प्रकार उघडकीस आला आहे. पाच ते सहा चोरट्यांनी धारधार शस्त्राचा धाक दाखवून सोन चांदीच्या दागिन्यासह सव्वा लाखांची रक्कम लंपास केली. धक्कादायक म्हणजे या चोरट्यांनी एका व्यक्तीला जबर मारहाण देखील केली आहे. या सशस्त्र दरोड्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सदर घटना बीडमधील वडवणी तालुक्यातील खळवट निमगाव या गावात मध्यरात्रीच्या दरम्यान घडली आहे. पाच ते सहा अज्ञात चोरट्यांनी धारधार शस्त्राचा धाक दाखवून अभिमान मारुती राऊत यांच्या घराचे मुख्य गेट तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील झोपलेल्या मंडळींना धाक दाखवला आणि कपाटातील ठेवलेले साडेसात तोळे सोने, एक लाख चोवीस हजार रुपयांची रक्कम स्वतःकडे ठेवली. तर दुसऱ्या ठिकाणी हरिभाऊ दिगंबर राऊत यांच्या घरात प्रवेश करून कपाटात ▶▶ पान २ वर

# अवैधरित्या दारू वाहतूक करीत असलेली कार पकडली

केज । प्रतिनिधी



केज येथे अवैधरीत्या चोरट्या दारूची वाहतूक करीत असलेली एका कारचा पाठलाग करून पोलिसांनी कारसह त्यातील दारू ताब्यात घेतली. मात्र त्याची वेळी अंधाराचा फायदा घेत दारूची वाहतूक करणारा कारचा चालक कार सोडून पळून गेला. या बाबतची माहिती अशी की, दि. १२ फेब्रुवारी रोजी केज पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे, पोलिस हेडकॉन्स्टेबल बाळासाहेब अहंकारे आणि पोलिस नाईक शिवाजी कागदे हे एका खाजगी वाहनाने रात्र गस्त घालीत असताना त्यांना सहाय्यक पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी माहिती दिलीं, की केज कळंब रोडवर एक पांढऱ्या रंगाची ऑल्टो ▶▶ पान २ वर

# संपादकीय

## एकत्रिकरणाचं भवितव्य

ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे. २८ जानेवारीच्या सकाळी बारामतीत दुर्दैवी विमान अपघात झाला नसता, त्यात अजितदादा पवार यांचं निधन झालं नसतं, तर आज कदाचित सर्व वृत्तपत्रांत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रिकरणाच्या बातम्यांचे मथळे असते. 'कदाचित' म्हणण्याचं कारण एवढंच, की दिशा निश्चित होती; पण प्रक्रियेचे तपशील ठरत होते. दोन्ही राष्ट्रवादी एकमेकांविरोधात सर्वोच्च न्यायालयात पोहोचले असल्याने काही तांत्रिक बाबी आडव्या येऊ शकल्या असत्या. शिवाय, राजकीय घडामोडींत कधी कोणते फाटे फुटतील, हे सांगता येत नसतं. त्यामुळे, एखादी गोष्ट प्रत्यक्ष घडत नाही, तोपर्यंत त्याबाबत खात्रीने बोलण्याला काही अर्थ नसतो. 'घड्याळ'वाल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही नेते 'अशी काही चर्चा सुरू असल्याचं आम्हाला माहीत नव्हतं. तसं असतं, तर दादा आमच्याशी बोलले असते' असं सुरुवातीला म्हणाले. पण, त्यानंतर संबंधितांकडून चर्चेच्या फेऱ्यांचे अनेक तपशील, चित्रफितीच दाखवल्या गेल्याने या नेत्यांकडून पुन्हा तशा प्रकारचं वक्तव्य झालं नाही. आता उघड झालेल्या एकूण तपशिलावरून अशी चर्चा सुरू होती आणि खुद्द अजितदादाच त्यासाठी आग्रही होते, असं दिसतं. या चर्चेतील खाचाखोचा ते आपल्या पक्षातील सहकाऱ्यांना किती सांगत असतील, हा प्रश्न आहे. कारण, ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे. सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्री म्हणून निवड, पदग्रहणापूर्वीचे सोपस्कार, दिल्ली भेटीसाठीचा आग्रह या वारसदारांना समजत नाही, असं नाही. पण, आत्ताच काही भूमिका जाहीर करण्याची गरज नाही. सगळ्यांचं ऐकून, प्रत्येकाची पावलं कुठे पडतात हे नीट समजावून घेऊन मगच आपली भूमिका स्पष्ट करण्याचं त्यांनी ठरवलं असावं. कुठेही काहीही न बोलता सरकारमधील, पक्षातील; अगदी पक्ष संघटनेतील घडी बसवण्याला त्यांनी प्राधान्य दिलेलं दिसतं. आजच्या घडीला हेच धोरण योग्य आहे. अजितदादांचे वारसदार नवखे किंवा अपरिपक्व आहेत, त्यांना आपल्यालाच पुढे घेऊन जायचं आहे, असा समज कोणी करून घेतला असेल, तर त्यांना लवकरच ठेच लागण्याची शक्यता यावरून दिसते. दोन राष्ट्रवादी वेगळ्या झाल्या, तेव्हांही त्याबाबतच्या चर्चा वेगवेगळ्या पातळ्यांवर कितीतरी दिवस सुरू होत्या. तेव्हांही पक्षात आणि पवार कुटुंबात अशा दोन्ही आघाड्यांवर स्वतंत्रपणे बोलणी होत होती. दोन्ही बाजूला अग्रभागी पवार कुटुंबातील व्यक्तीच असल्याने साहजिकच त्यावेळीही 'केवळ पक्षात फूट, की कुटुंबात दरी?' अशा प्रकारच्या चर्चा झाल्या होत्या. भारतीय जनता पक्षाबरोबर जाण्यासाठी जे आग्रही होते, त्यातील प्रत्येकाची त्या आग्रहामागे वेगवेगळी कारणं होती. त्याची चर्चाही त्यानंतर पुष्कळ झाली होती. पण, तो निर्णय घेण्याच्या काळात स्वतः अजितदादा किती तणावात होते, याची कल्पना भारतीय जनता पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह राजकीय वर्तुळालाही आहे. दोन राष्ट्रवादी स्वतंत्र झाल्यानंतरही सुरुवातीचे काही महिने सोडले, तर नंतर दोन्ही बाजूंनी परस्परांवरचे वार थांबले होते. विधिमंडळाच्या अधिवेशन काळात दोन्ही पक्षांचे नेते आणि आमदार किती समन्वयाने वावरायचे, हे तर जगजाहीर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांनी अनेक ठिकाणी आघाडी करण्याचा निर्णय घेतला होता. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिल्लीत शहा यांची भेट घेऊन त्यांना त्याची कल्पनाही दिली होती. भाजपसारख्या तगड्या पक्षाच्या युतीत असताना त्यांच्या संमतीशिवाय असा काही निर्णय कोणी पक्ष परस्पर घेईल, हे संभवत नाही. म्हणजे, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने केलेली निवडणूक आघाडी ही भाजपला पूर्ण अवगत होती आणि त्यांची त्याला मूळ संमती होती, असं मानायला जागा आहे. भाजपचं केंद्रीय नेतृत्व राजकीय परिणामांचा विचार केल्याशिवाय आणि एखाद्या राजकीय घडामोडीचं पूर्ण तार्किक चित्र स्पष्ट असल्याशिवाय गाफीलपणे परवानगी देणंही शक्य वाटत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसमधील घडामोडींची माहिती महायुतीतल्या अन्य पक्षांच्या वरिष्ठ वर्तुळात असणार असा निष्कर्ष यावरूनच काढला जातो आहे. राष्ट्रवादीतल्या नेत्यांनी याही गोष्टीचा विचार उघड वक्तव्य करण्याआधी करायला हवा. अर्थात याविषयी आता कोणी उघड कबुली देण्याचा किंवा दुजोरा देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण, त्या अपघाताने सर्व समीकरणंच बदलून गेली आहेत. एकत्रिकरणाचा विचार करणारे आपापला विचार करताहेत; पण हे एकत्रिकरण ज्या राजकीय चित्राचा भाग होतं, त्या चित्रातल्या अनेक घटकांची आताच्या घडीची गरज, सोय काय आहे, याचा विचार कोणी करतं आहे, असं दिसत नाही. सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली भेटीतही या विषयावर चर्चा झाल्याचं काही ठिकाणी प्रसिद्ध झालं आहे. त्याचे तपशील एक – दोन दिवसात कळतील. जर चर्चा झालीच असेल, तर बदललेल्या परिस्थितीत भाजपची भूमिका काय आहे, त्यांचा कल कुठे आहे, हे तिथे उपस्थित असलेल्यांना कळलंच असेल. राष्ट्रवादीतले प्रमुख चार–पाच नेते या एकत्रिकरणाला जो विरोध करताहेत, त्याची दखल भाजप कशी घेणार आहे, यावरच या 'चर्चेतल्या एकत्रिकरणा'चं भवितव्य अवलंबून आहे. अजितदादा या एकत्रिकरणाला तयार होते, त्यामागे राजकीय कारणांपेक्षा भावनिक कारणं जास्त होती, असं म्हणतात. ती भावनिक कारणं त्यांच्या वारसांच्या दृष्टीने किती महत्त्वाची ठरतात, हा मुद्दा आहेच. शिवाय, ही प्रक्रिया नेटाने पुढे नेण्याएवढी तीव्र इच्छाशक्ती आता कुणाकडे असण्याचं कारण नाही, ही वस्तुस्थितीही लक्षात घ्यावी लागेल. आधी कुटुंब; मग पक्ष याच क्रमाने ही दुरुस्ती व्हायची तेव्हां होईल.

# रेल्वेसाठी १४ हजार कोटींची तरतूद




मराठवाडा व कर्नाटकला जोडणारा नांदेड बिदर या रेल्वे मार्गासाठी महाराष्ट्राने आपला वाटा राज्याच्या अर्थसंकल्पात मंजूर केला आहे; परंतु कर्नाटक राज्याने त्यांच्या भागातील रेल्वे मार्ग मंजूर करण्यासाठी निधी देण्यास टाळाटाळ चालविली आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले आहे. विशेष म्हणजे नांदेडचे खासदार या कामासाठी कमी पडत आहेत. तसेच नांदेड येथे राज्यसभेवर असलेले भाजपचे दोन्हीही खासदार यासाठी अपुरे पडत असल्याचे जाणवत आहे. यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प मराठवाड्याला चांगलाच पावला. मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे मार्गांसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात १४ हजार कोटींची तरतूद करण्यात आली. यामध्ये अहमदनगर–बीड–परळी तसेच जालना–जळगाव व नांदेड–वर्धा रेल्वे मार्गांचा समावेश आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी हे तीन रेल्वे मार्ग पूर्ण होणे अत्यंत आवश्यक आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून हे रेल्वे प्रकल्प प्रलंबित असल्याने त्यावरील कामाचा खर्च दिवसेंदिवस वाढतच होता; परंतु केंद्रीय अर्थसंकल्पात या रेल्वे मार्गांसाठी १४ हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याने आता मराठवाड्याच्या विकासाला मोठा हातभार लागणार आहे. अहमदनगर–बीड – परळी या रेल्वे मार्गासाठी ४ हजार ९५७ कोटींची तरतूद करण्यात आली. जालना–जळगाव रेल्वे मार्गासाठी ५८०४ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला. तसेच मराठवाडा व विदर्भाला जोडणारा नांदेड–वर्धा हा रेल्वे मार्ग गेल्या अनेक वर्षांपासून पूर्ण झालेला नाही. या रेल्वे मार्गासाठी ३ हजार ४४५ कोटींची तरतूद या केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आली. या तिन्ही रेल्वे मार्गांच्या प्रलंबित कामांसाठी मराठवाड्यातून गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा सुरू आहे. मराठवाड्यातील खासदार या पाठपुराव्याला कमी पडल्यामुळेच आजपर्यंत या कामाला उशीर झाला. माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी याबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता. मराठवाडा व कर्नाटकला जोडणारा नांदेड बिदर या रेल्वे मार्गासाठी महाराष्ट्राने आपला वाटा राज्याच्या अर्थसंकल्पात मंजूर केला आहे; परंतु कर्नाटक राज्याने त्यांच्या भागातील रेल्वे मार्ग मंजूर करण्यासाठी निधी देण्यास टाळाटाळ चालविली आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले आहे. विशेष म्हणजे नांदेडचे खासदार या कामासाठी कमी पडत आहेत. तसेच नांदेड येथे राज्यसभेवर असलेले भाजपचे दोन्हीही खासदार यासाठी अपुरे पडत असल्याचे जाणवत आहे. २०१४ पासून नरेंद्र मोदी हे भारताचे पंतप्रधान झाल्याने देशाचा समतोल विकास होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील मराठवाड्याच्या विकासाकडे विशेष लक्ष केंद्रित केलेले आहे. मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे प्रश्नांना पूर्णत्वास नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच वारंवार आढावा घेत आहेत. प्रलंबित रेल्वे मार्गांच्या कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भागातील खासदारांना कामाला लावावे, अशी मागणी होत आहे. नांदेड–मनमाड मार्गावरील नांदेड–पुणे ही रेल्वे पुणेऐवजी हडपसरपर्यंत धावत आहे. नांदेडवरून दुपारी ३ वाजून पंधरा मिनिटांनी सुटणारी ही रेल्वे मनमाडमार्गे हडपसर येथे सकाळी ७.३० वाजता पोहोचत आहे. यामुळे पुणे शहर व पिंपरी–चिंचवड या भागात जाण्यासाठी प्रवाशांना आर्थिक झळ सोसावी लागत आहे. विशेष म्हणजे २६ जानेवारीपासून हा बदल करण्यात आला. पूर्वी ही रेल्वे पुणे स्थानकापर्यंत धावत होती. त्यावेळी या रेल्वेसाठी तिकीटही मिळणे अवघड होते; परंतु आता ही रेल्वे मराठवाड्यातील प्रवाशांसाठी गैरसोयीची केल्याने केवळ ट्रॅव्हल्सवाल्यांचे फावत आहे. ज्या रेल्वे सेवेला चांगला प्रतिसाद असतो अशा रेल्वे सेवा अडगळीत टाकण्याचे प्रकार हल्ली वाढले आहे. सर्वसामान्य प्रवाशांना अशा बदलामुळे त्रास सहन करावा लागतो. याकडे लक्ष देण्यासाठी सक्षम यंत्रणा नसल्याने मराठवाड्यातून संताप व्यक्त केला जात आहे. नांदेड–पुणे या मार्गावर मराठवाड्यातील प्रवासी वंदे भारत रेल्वेसेवेची वाट पाहत आहेत. मराठवाड्यातील हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी पुण्यात स्थायिक आहेत. याचबरोबर नोकरीच्या निमित्ताने मराठवाड्यातील अनेकजण पुण्याला ये–जा करतात. विशेष म्हणजे मराठवाड्यातून पुण्याला हजारो ट्रॅव्हल्स दररोज धावत असतात. ट्रॅव्हल्स चालकांची लॉबी मराठवाड्यातून पुण्याला जाणाऱ्या रेल्वे सेवेला नेहमीच अडथळे आणतात, असा संताप मराठवाड्यातून नेहमीच व्यक्त होत असतो. मराठवाड्यातील खासदारांनी आपल्या ताकदीची एकजूट दाखवून नांदेड पुणे वंदे भारत सेवा सुरू करून दाखवावी, अशी मागणी मराठवाड्यातून गेल्या अनेक दिवसांपासून होत आहे. मराठवाडा व तेलंगणाला जोडणाऱ्या नांदेड–हैदराबाद दरम्यान वंदे भारत रेल्वेसेवा सुरू होणार असल्याचे तीन महिन्यांपूर्वीच काही खासदारांनी जाहीर केले होते; परंतु अद्यापपर्यंत नांदेड–हैदराबाद दरम्यान वंदे भारत रेल्वेसेवेचे कसलेही नियोजन झालेले नाही. या रेल्वेसेवेबाबत कसलाही निर्णय झालेला नसतानाच नांदेडमधील काही खासदारांनी याचे श्रेय घेऊन स्वतःची प्रसिद्धी करून घेतली. मराठवाड्यातील तीन महत्त्वाच्या प्रलंबित रेल्वे मार्गांसाठी १४ हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याने भविष्यात मराठवाडा हा एक महत्त्वाचा औद्योगिक विकासाचा भाग म्हणून ओळखला जाणार आहे. ज्या भागात रेल्वे सेवा नव्हती, तिथपर्यंत रेल्वे सेवेचा विस्तार झाल्यास भविष्यात दळणवळण व वाहतुकीची सुविधा वाढणार आहे. एकीकडे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मराठवाडा, विदर्भ तसेच राज्यातील सर्व प्रमुख रस्ते चकाचक केल्यामुळे त्याचा फायदा औद्योगिक विकासासाठी होत आहे. यापुढे रेल्वेसेवेचा विस्तार झाल्यानंतर देशाच्या कानाकोपऱ्यांतून तसेच बाहेर देशातूनही मराठवाड्यात औद्योगिक विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा केली जात आहे. यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प मराठवाड्यातील रेल्वे सेवांच्या बाबतीत अतिशय महत्त्वपूर्ण ठरला. या केंद्रीय अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद करण्यात आल्याने भविष्यात मराठवाड्याचा मोठा कायापालट दिसून येणार आहे. कुठलेही प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ठरावीक वेळेत ती कामे होणे महत्त्वाची असतात. याच दृष्टीने मराठवाड्यासाठी केलेली निधीची तरतूद योग्य वेळी केली गेली तर त्याचा फायदा नक्कीच मराठवाड्याच्या विकासासाठी होणार आहे, हे मात्र निश्चित.

# पान १ वरून

## पशुपालनाला कृषीचा...

अभिवादन करण्यात आले.  पशुपालन हा व्यवसाय उद्योगात रुपांतरीत व्हावा यासाठी शासन पुढाकार घेत आहे. या खात्याचा कार्यभार स्विकारल्यावर स्व. अजित पवार यांच्या पुढाकाराने बारामतीसोबत परळी येथील पशु महाविद्यालय आपण मंजूर करुन घेतले. आजचे हे भव्य प्रदर्शन पाहून स्व. अजित पवार आज असते तर त्यानांही आयोजन आवडले असते असे पंकजा मुंडे म्हणाल्या. राज्याचे मुख्यमंत्री देवेद्र फडणवीस उद्या प्रदर्शनाची पाहणी करण्यासाठी येत आहे. त्याचेही नियोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर मंत्री पंकजा मुंडे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ✻ या ठिकाणी स्व. अजित पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ एक स्वतंत्र दालन देखल उभारण्यात आले आहे. ✻ पशुपालन तंत्रात आलेले नवे बदल तेसच उत्पादकता वाढवणारी आणि पशुंवर उपचार करणारी औषधे या ठिकाणी उपलब्ध आहेत. ✻ या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची मार्गदर्शपर व्याख्याने स्वतंत्रपणे होत आहेत.

## माजलगाव येथे...

या सर्व प्रकाराकडे महसूल विभाग व स्थानिक पोलीस प्रशासनाने डोळेझाक केल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. काही ठिकाणी तक्रारी दाखल करूनही कारवाई होत नसल्याचे नागरिक सांगतात. रात्रीभर ट्रॅक्टर–डंपरची ये–जा सुरू असते, पण कारवाई शून्य आहे, असे एका ग्रामस्थाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले. माजलगाव परिसरात यापूर्वीही अवैध वाळू उपशावर कारवाई करण्यात आली होती; मात्र ती केवळ दिखाव्यापुरती असल्याची चर्चा आहे. काही दिवस धडक कारवाई केल्यानंतर पुन्हा परिस्थिती पूर्ववत होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताचा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार देण्याची तयारी सुरू केली असून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. नदीपात्रांचे संरक्षण, पर्यावरणाची हानी रोखणे आणि शासनाचा महसूल वाचवण्यासाठी कठोर पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे. जर तात्काळ कारवाई झाली नाही, तर आगामी काळात आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. अवैध वाळू उपशामुळे होणारे पर्यावरणीय व आर्थिक नुकसान थांबवण्यासाठी प्रशासनाने ठोस भूमिका घेणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, कारवाईची भाषा फक्त कागदावर आणि प्रत्यक्षात मात्र मोकळे रान अशीच स्थिती कायम राहील, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

## चिठ्ठी विभागात...

अशा प्रकारांमुळे रुग्णांचा विश्वास डळमळीत होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. रुग्ण नातेवाईकांची आर्थिक पिळवणूक तात्काळ थांबवून जबाबदार अधिकाऱ्यांनी योग्य ती उपाययोजना करावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

## खळवट निमगाव...

ठेवलेली दोन तोळे सोने या चोरट्यांनी लुटले. यानंतर लुटारूंनी धमकावत घटनस्थळावरून पळ काढला. यावेळी हरिभाऊ राऊत यांनी चोरांचा पाठलाग करून त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र पळापळी करत असताना चोरट्यांनी त्यांच्या पाठीवर शस्त्राने मारहाण केली यामध्ये ते गंभीर जखमी झाले. याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस या घटनेचा सखोल तपास करत आहेत.

## अवैधरित्या दारू...

कार क्र. (एम एच –३१/डी सी– ४२१९) ही संशयास्पदरित्या धावत असून त्या कारमधून

# पान १ वरून

अवैध्यरित्या चोरट्या दारूची वाहतूक होत आहे. माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे, पोलिस हेडकॉन्स्टेबल बाळासाहेब अहंकारे आणि पोलिस नाईक शिवाजी कागदे हे सतर्क झाले. त्यांनी हॉटेल संतोष पॅलेस समोर सापळा लावून सदर कार अडविण्याचे प्लॅन केला. परंतु त्या कार चालकाच्या लक्षात, पोलिसांचा प्लॅन आल्या नंतर तो पळून जाऊ नये म्हणून पोलिसांनी केन येत कळंब चौकातील छत्रपती शिवाजी महाराज चौका पर्यंत त्याचा पाठलाग केला. त्यावेळी कार चालकाने छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या पासून कार बीडच्या दिशेने वळवून भरधाव वेगाने बीडच्या दिशेने जावू लागला. पोलिस पथकाने त्याला पोलीस ठाण्याच्या गेट समोर पोलिसांनी त्याला अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याने पोलिसांना न जुमानता कार पुढे घेऊन गेला. त्या नंतर पोलिस पाठलाग करीत असताना कार चालकाने केज येथील महात्मा फुले नगरच्या अरुंद गल्लीत कार घातली आणि कार सोडून पळून गेला. त्या नंतर पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे,पोलीस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इ ईनामदार, पोलिस हेडकॉन्स्टेबल बाळासाहेब अहंकारे आणि पोलिस नाईक शिवाजी कागदे यांनी पंचा समक्ष कारची झडती घेतली असता कारमध्ये ड्रिल क्लासिक व्हिस्की असे नाव लिहिलेले ११ बॉक्स त्याच्या मध्ये १३२ बॉटल्स होत्या प्रत्येक बॉटलीची किंमत ७५० रु. प्रमाणे त्याची एकूण ९९ हजार रु किंमतीचा मुद्देमाल माल आणि इतर सहित्य आढळून आले. त्या नंतर पोलीस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार यांच्या फिर्यादी वरून अज्ञात कार चालका विरुद्ध गु. र. नं. ६८/२०२६ महाराष्ट्र दारू बंदी अधिनियमचे कलम ६५(ए), ६५(ई), ६६(१) (बी), ८१, ८३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे हे करीत आहेत.

✻ कारमध्ये आढळून आलेल्या दारूच्या बायकां बूचाचा उद्देश काय ? :– पोलिसांनी चोरट्या दारूसह ताब्यात घेतलेल्या त्या कार मध्ये एका पोत्यात दारूच्या बॉटलला लावण्यासाठी वापरण्यात येणारे बूच आढळून आले. त्यामुळे या चोरट्या दारूची विक्री करीत असलेला इसम आणि त्याचे साथीदार ही बनावट दारू निर्मिती करून ती विक्री करीत असावेत असा अंदाज आहे. ✻ उत्पादन शुल्क विभाग झोपेचे सोंग घेत आहे !:– जिल्ह्यात अनेक धाबे आणि हॉटेल्सवर खुलेआम बनावट दारू विकली जात असताना उत्पादन शुल्क विभाग मात्र झोपेचे सोंग घेऊन.गप्प एक आहे. तसेच मागील काही महिन्या पूर्वी उत्पादन शुल्क विभागाने केज मध्ये काही लुटुपुच्या कारवाया केल्या मात्र त्याची माहिती माध्यमांना दिली नसून संबंधित विभागाचे अधिकारी मात्र माध्यमांना माहिती देण्यास टाळाटाळ करीत असतात.

## लाडक्या बहिणींमुळे...

एसटी महामंडळाने प्रवास करु लागली आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थिती सुधारु लागली आहे. या योजनेची सुरुवात १७ मार्च २०२३ रोजी झाली होती. यामध्ये महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्यात आली. त्यानंतर महिला प्रवाशांचा आकडा वाढला आहे. आतापर्यंत कोट्यवधि महिलांनी प्रवास केला आहे. या योजनेसाठी शासनाकडून महामंडळाला ५०८०.४३ कोटी रुपये मिळाले आहेत.

## गुन्हा दाखल...

राहिला नाही म्हणून गुन्हा दाखल करण्यापूर्वीच ड श्रीराज शेळके यांच्याकडून अटकपूर्व जामीन बीड सत्र न्यायालयात मांडण्यात आला. माननीय जिल्हा व सत्र न्यायालयाने ड श्रीराज शेळके यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून गुन्हा दाखल नसताना देखील अटकपूर्व जामीन मंजूर केलेला आहे. सदरील ट्रक सोडवण्याबाबत प्रयत्न सुरु असून पोलीस स्टेशनच्या निष्काळजी कामामुळे ट्रक मालकाचे अनोतान नुकसान झालेले दिसून येते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# कॉपीमुक्त अभियानासाठी ठोस पावले उचला

## विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर विभागातील काही परीक्षा केंद्रांवर घडलेल्या गैरप्रकारांच्या बातम्या राज्यात पोहोचल्या असून, यामुळे विभागाच्या प्रतिमेला धक्का बसला आहे. त्यामुळे यापुढे अशा घटना घडू नयेत, यासाठी सर्व यंत्रणांनी अधिक जबाबदारीने काम करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.

दहावी व बारावी परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विभागातील पोलीस उपमहानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर, नांदेड जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प., पोलीस अधिक्षक, विभागीय शिक्षण उपसंचालक, एसएससी बोर्डाचे अध्यक्ष व सचिव, तसेच शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांच्यासमवेत विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी आढावा बैठक घेतली.

बैठकीत काही केंद्रांवर कॉपी व गैरप्रकार झाल्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या घटनांमुळे वृत्तपत्रांमध्ये नकारात्मक बातम्या प्रसिद्ध झाल्याने विभागाच्या कामकाजात सुधारणा करण्याची गरज



असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अंतर्गत होणाऱ्या परीक्षांमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नियंत्रण कक्ष, भरारी पथके व निरीक्षण व्यवस्था अधिक मजबूत करण्याचे निर्देश आयुक्त पापळकर यांनी दिले.

बैठकीत सांगण्यात आले की, बीड जिल्ह्यात १०३ परीक्षा केंद्रांसाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष व १०३ पथके कार्यरत करण्यात आली आहेत. तसेच सर्व केंद्रांवर नियमित तपासणी केली जात आहे.

छत्रपती संभाजीनगर व बीड येथील काही शिक्षकांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली असून, संबंधित संस्थेच्या दोषी शिक्षकांविरुद्ध निलंबनाची कारवाई करण्याबाबत कळविले असल्याचे संबंधित शिक्षणाधिकारी यांनी बैठकीत सांगितले. यापुढे कोणत्याही केंद्रावर गैरप्रकार झाल्यास संबंधित संस्थेतील दोषींविरुद्धही गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा देण्यात आला. केवळ शिक्षकांवरच नव्हे, तर सर्व संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असे आयुक्तांनी सांगितले. कॉपीमुक्त अभियानासाठी करत असलेल्या कार्यवाहीची माहिती जिल्हाधिकारी, नांदेड, लातूर, परभणी, जालना यांनी बैठकी दरम्यान दिली. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी परीक्षा या कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली. संवेदनशील परीक्षा केंद्रावर बैठेपथक नियुक्त करुन त्यांचा नियमित आढावा घेण्याचे निर्देश देण्यात आले. पोलीस प्रशासनाने गैरप्रकार घडलेल्या ठिकाणी गुन्हे दाखल करण्याबाबत त्वरेने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीत लातूर जिल्हाधिकाऱ्यांनी मांडलेले मुद्देही महत्त्वाचे असल्याचे नमूद करण्यात आले. इतर जिल्ह्यांतील अडचणींचाही आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांचे भवितव्य लक्षात घेता परीक्षा कॉपीमुक्त, शांत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडणे आवश्यक आहे. सर्व अधिकारी, कर्मचारी व संस्था चालकांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले. योग्य नियोजन व कठोर अंमलबजावणी झाल्यास आगामी दहावी व बारावीच्या परीक्षा सुरळीत पार पडतील, असा विश्वास आयुक्त पापळकर यांनी व्यक्त केला.

## युवासेना जिल्हाप्रमुख गणेश भैय्या शिराळे यांनी असंख्य युवकांचा शिवसेनेत प्रवेश घडवून आणल्याबद्दल मा. ना. मंत्री संजयजी सिरसाट यांनी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत अभिनंदन केले



**बीड । प्रतिनिधी**

ना. संजयजी सिरसाट साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप आणि युवासेना जिल्हाप्रमुख गणेश भैय्या शिराळे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड येथे युवासेनेचा भव्य प्रवेश व पदवाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात शेकडो युवकांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश करत युवासेनेवर विश्वास व्यक्त केला. यावेळी संघटन बळकटीसाठी विविध पदांवर नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. प्रद्युम्न गोकुळराव पवार (रा. जुना मोंढा पेठ, बीड) यांची युवासेना उपजिल्हाप्रमुख प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच तेजस उमेश शेटे (रा. शनिवार पेठ, बीड) यांची युवासेना बीड उपशहर प्रमुख प्रभारी, निलेश वसंतराव थोरात (रा. पेठ, बीड) यांची युवासेना बीड शहर संघटकप्रमुख प्रभारी, तर महेश भगवानराव कदम यांची युवासेना बीड तालुकाप्रमुख प्रभारी पदी नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान युवासेनेच्या नेतृत्वाखाली युवकांची वाढती उपस्थिती आणि संघटनेप्रती असलेला उत्साह दिसून आला. युवासेना प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली युवक मोठ्या संख्येने संघटनेत सहभागी होत असून भविष्यात संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमध्ये स्नेहसंमेलन संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलचे,वार्षिक स्नेहसंमेलन सोमवार दि.०९ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले वडवणी शहरातील नामांकित डॉक्टर वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त एकाच व्यासपीठावर एकत्र आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चौसाळा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय माजी आमदार मा.केशवराव आंधळे तर प्रमुख उद्घाटक म्हणून मा.डॉ.भाऊसाहेब पुर्भे तसेच प्रमुख पाहुणे डॉ.गुरुदत्त महादर,डॉ.शंकर वाघ,डॉ.जगदीश टकले,डॉ.राम बडे,डॉ.अमोल मुंडे,माजी सभापती सौ. सुलोचना आंधळे,उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,उपसरपंच मयुर बडे,संचालक रणजीत भैय्या धस,संस्थेचे संचालक इंजि. अशोक भैय्या आंधळे,सौ. कोमल संजय आंधळे,सौ.स्मिता अशोक आंधळे(एमएसईबी



अभियंता),इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शितल लाटणे यांची मान्यवर म्हणून उपस्थिती लाभली. मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन,प्रतिमा पूजन करून वार्षिक स्नेहसंमेलनाचे श्रीफळ फोडून उद्घाटन करण्यात आले.मान्यवरांचे इंग्लिश स्कूलच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच कार्यक्रमात बेस्ट स्टुडन्ट ऑफ द इयर,शंभर टक्के उपस्थिती,क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळवलेले गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गुणगौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.भाऊसाहेब पुर्भे साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की,माजी आमदार केशवदादा आंधळे यांनी ग्रामीण भागातील मुलांना इंग्रजीतून शिक्षण घेता यावे म्हणून प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलची २००९ स्थापना केली आज या इंग्लिश स्कूल मधून दर्जेदार शिक्षण मुलांना दिले जात आहे असे बोलून वार्षिक स्नेहसंमेलनाला त्यांनी शुभेच्छा दिल्या तसेच उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले त्यानंतर वार्षिक स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष माजी आमदार केशवराव आंधळे यांनी इंग्लिश स्कूलमध्ये विविध उपक्रम राबवले जातात त्यांचे कौतुक करून शिक्षिकांचे अभिनंदन केले व वार्षिक स्नेहसंमेलनाला शुभेच्छा दिल्या. देशभक्तीपर गीत,बंजारा गीत,लावणी,कोळीगीत तसेच मराठी,हिंदी चित्रपटातील गीतावर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.उत्कृष्ट नृत्य सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या शोभाताई के. आंधळे यांनी केले तर सूत्रसंचालन दीपा फासे मॅडम व प्रणिता तांबडे मॅडम यांनी केले व आभार उपप्राचार्य मस्के सर यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश वारे सर तसेच इंग्लिश मधील सर्व शिक्षिका यांनी परिश्रम घेतले.

## महिला शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने विद्यालयात शैक्षणिक साहित्याचे वाटप

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

पुण्याच्या कात्रज येथील महिला शक्ती प्रतिष्ठाणच्या वतीने बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे नुकतेच वाटप करण्यात आले. आयोजीत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य किसन सावंत हे उपस्थीत होते. यावेळी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा आरती गणाचार्य, विश्वस्त अरुण गणाचार्य, उर्मिला मानकर , डॉ. कृष्णा मानकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, कंपास बॉक्स व वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी उपक्रम पाहुन प्राचार्य सावंत यांनी महिला शक्ती प्रतिष्ठानच्या सामाजिक बांधिलकीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी माजी प्राचार्य दत्तात्रय मानकर यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करण्याचे व दिलेल्या साहित्याचा योग्य उपयोग करण्याचे आवाहन केले.

## लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

शुक्रवार रोजी विद्यालयात सन २०२५ -२६ इयत्ता १०वी च्या विद्यार्थ्यांना निरोप / ऋणनिर्देश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री . राजेंद्र आगवान ( दै.रणझुंजारचे संपादक ) तर प्रमुख पाहूणे शेख मजिद ( दै.रिपोर्टर चे सहसंपादक ), माजी सरपंच विक्रमअण्णा शेंडगे व राम माने हे होते. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्याच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले या प्रसंगी ५वी ते ९ वी च्याविद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शुभेच्छा दिल्या व इ १० वी च्या विद्यार्थ्यांनी शाळेत शिकत असतानाचे अनुभव कथन केले . अध्यक्ष , प्रमुख पाहुणे व शिक्षकानीआपल्या मनोगताच्या माध्यमातून शिक्षणाविषयीची जिद्द, चिकाटी , अनुभव तसेच सामाजिक बांधिलकी, करीअर मार्गदर्शन या विषयी आपले विचार मांडले व शुभेच्छा दिल्या . कार्यक्रमास पालक व नागारीक बहुसंख्येने उपस्थित होते.

# गेवराईत महिलांच्या कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न

### ● क्रांती महिला असंघटित कामगार युनियन व कोरो इंडिया यांचा पुढाकार

**गेवराई । प्रतिनिधी**

क्रांती महिला असंघटित कामगार युनियन, महाराष्ट्र राज्य व कोरो इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी गेवराई येथील जगदंबा आय.टी.आय. कॉलेज परिसरात महिलांसाठी भव्य कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. महिलांच्या क्रीडा कौशल्याला व्यासपीठ मिळावे, त्यांच्यात आत्मविश्वास वाढावा आणि संघभावना दृढ व्हावी या उद्देशाने



या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांना गेवराई शहर व परिसरातील महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात समाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी शारदा स्पोर्ट्स अकॅडमी, गेवराईचे अध्यक्ष रणवीर पंडित, पत्रकार विनोद नरसाळे, शेख अमीन, कोरो इंडियाच्या रुक्मिणी नागापुरे, लक्ष्मी वाघमारे, क्रांती महिला संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा शाहीन पठाण, शेर-ए-हिंद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शेख आमेर पाशा, कोरोचे विलास मगरे, तेजस्विनी भोर, शिवप्रताप संस्थेचे सुधाकर बुकन, निर्धार संस्थेचे नारायण ढवरे, रुलर डेव्हलपमेंट संस्थेचे संजय आगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

### ● ७५ वर्षांच्या आजींनीही मैदान गाजवले

**या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे ७५ वर्षांच्या आजींनीही उत्साहाने मैदानात उतरून कबड्डी खेळत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या जिद्दीने आणि आत्मविश्वासाने उपस्थितांना प्रेरणा मिळाली. वय हे केवळ एक आकडा आहे, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. दरम्यान स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी अंजुम पठाण, शकुंतला घुंगासे, मोहन धुरंधरे, शीतलताई गोचडे, सुवर्णा मस्के, कोच कापसे सर तसेच कोरो टीम, क्रांती महिला संघटना व शेर-ए-हिंद संस्थेच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. महिलांच्या क्रीडा सहभागातून समाजात सकारात्मक संदेश देणारा हा उपक्रम उत्साहात आणि यशस्वीरीत्या संपन्न झाला.**

कार्यक्रमाची प्रस्तावना रुक्मिणी नागापुरे यांनी केली. त्यांनी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित केले. कोरो इंडियाच्या लक्ष्मी ताई वाघमारे यांनी आपल्या मनोगतात महिलांच्या सक्षमीकरणासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित करत, ग्रामीण भागातील महिलांनी पुढे येऊन खेळात सहभागी व्हावे असे आवाहन केले. सूत्रसंचालन तेजस्विनी भोर यांनी पार पाडले.

या स्पर्धांमध्ये एकूण १३ संघांनी सहभाग नोंदविला. सामने अत्यंत चुरशीचे आणि रोमांचक झाले. खेळाडूंनी उत्कृष्ट बचाव आणि आक्रमण कौशल्याचे प्रदर्शन करत प्रेक्षकांची दाद मिळवली. अंतिम फेरीत जय तुळजाभवानी संघ, गेवराई यांनी दमदार खेळ करत प्रथम क्रमांक पटकावला. जिजामाता संघ, गेवराई यांनी द्वितीय क्रमांक मिळवला, तर गढी गेवराई येथील यशस्वी संघाने तृतीय क्रमांक मिळवून आपले स्थान निश्चित केले. विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके, सन्मानचिन्हे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

# मोतीलाल ओसवाल यांच्या पुढाकारातून रुजणार कृषिक्रांतीचे बीज!

### ग्लोबल विकास ट्रस्ट आणि AU SMALL FINANCE बँकेचा शेतकऱ्यांना मिळणार भक्कम आधार

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि निसर्गाच्या सततच्या लहरीपणाशी झुंज देणारा हा प्रदेश. येथे शेती म्हणजे केवळ व्यवसाय नाही, तर जिवंत राहण्यासाठीची झुंज आहे. कधी पाण्याअभावी पिके करपतात, तर कधी अतिवृष्टीने उभे पीक वाहून जाते. अशा संकटांच्या गर्तेत सापडलेल्या शेतकऱ्याला आधुनिक शेतीकडे वळण्यासाठी लागणारे भांडवल मात्र नेहमीच अपुरे पडते. परिणामी, शेतकरी कर्जबाजारी होतो आणि विकासाचे स्वप्न अपुरेच राहते. हीच वेदना ओळखून,



शेतकऱ्यांच्या आयुष्यात नवे परिवर्तन घडवण्यासाठी मोतीलाल ओसवाल समूहाने एक धाडसी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. शेतकरी कर्ज फेडत नाहीत हा बँकिंग क्षेत्रात रुजलेला गैरसमज मोडीत काढण्याचा हा प्रयत्न ठरतो आहे. जर शेतकरी परिस्थितीमुळे कर्जफेड करू शकला नाही, तर त्याची जबाबदारी आम्ही घेऊ, असा विश्वास बँकेला देत प्रत्यक्ष कृतीत उतरवलेली ही योजना आज परिवर्तनाची बीजे रोवत आहे. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी मराठवाड्यात शाश्वत शेतीसाठी अनेक उपक्रम राबवले. जलसंधारणामुळे पाण्याची उपलब्धता वाढली आणि शेतकरी केळी, आंबा, सीताफळ, पपई यांसारख्या फळपिकांकडे तसेच तुती लागवडीसारख्या उद्योगांकडे वळू लागले. मात्र, वर्षानुवर्षांच्या आर्थिक संकटाने ग्रासलेल्या शेतकऱ्यांसाठी नव्या सुरुवातीसाठी लागणारे भांडवल उपलब्ध करणे ही मोठी अडचण होती. ही परिस्थिती मयंक गांधी यांनी मोतीलाल ओसवाल समूहाचे कार्यकारी संचालक रामदेव अग्रवाल यांच्यासमोर मांडली. शेतकऱ्यांच्या अडचणी ऐकताच त्यांनी तत्काळ मदतीचा निर्णय घेतला. AU SMALL FINANCE बँकेत शेतकऱ्यांच्या कर्जासाठी कोट्यवधी रुपयांची सुरक्षा ठेव जमा करण्यात आली.


## जाहिर प्रगटन

**मा.श्री. रफीक ए. शेख, राह दिवाणी न्यायाधीश,**
**क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : २६८ / २०२६**

अर्जदार- **१. आशा दशरथ निर्मळ, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. नेकनूर, ता.जि.बीड, २. अनंता दशरथ निर्मळ, वय ३६ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे, ३. परमेश्वर दशरथ निर्मळ, वय ३४ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे, ४. माया दशरथ निर्मळ, वय २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे,**

विरुध्द निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ वे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी **मयत नामे दशरथ हरी उर्फ हरीभाऊ निर्मळ हे / हया दिनांक २५/०७/२०२५ रोजी नेकनूर, ता. जि.बीड** येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार क २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र ४ ही मयताची मुलगी आहे.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- १२/०२/ २०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**पुढील तारीख: २५/०३/२०२६** **आदेशावरून**
**( मार्फत विधिज्ञ ॲड एस बी शिंदे )** **(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** **अधिक्षक**
शिक्का **क. लिपीक** **दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. वसंत एस. यादव साहेब, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश**
**व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: २५२/२०२६**
**गहिनीनाथ व इतर विरूध्द – निरंक**

अर्जदार – १) गहिनीनाथ पि. हरिभाऊ देवगुडे, वय ७३ वर्षे, धंदा शेती,रा. आनंदवाडी, पो. कळसंबर, ता. जि. बीड, २) रामेश्वर पि. गहिनीनाथ देवगुडे, वय २५ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे. ३) अश्विनी पि. गहिनीनाथ देवगुडे, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे. ४)स्वाती भ्र. प्रविण बोराडे, वय २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे. ५)पुष्पा भ्र. सुनिल वाघिरे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. उदंड वडगाव, ता. जि. बीड. ६) ज्योती भ्र. सचिन सावंत, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. सावंतवाडी, ता. जि. बीड

ज्याअर्थी मयत **नामे बेबीनंदा प्र. गहिनीनाथ देवगुडे रा. आनंदवाडी पो. कळसंबर ता.जि.बीड हे दि. ३१.०७. २०२५ रोजी मौजे आनंदवाडी** येथे मयत झाले आहेत.

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे बेबीनंदा प्र. गहिनीनाथ देवगुडे रा. आनंदवाडी पो. कळसंबर ता. जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज ०७-०२-२०२५रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **पुढील तारीख : २३.०६.२६** **आदेशावरून**
**( मार्फत – ॲड. एस. बी. शिंदे बीड )** **(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** **अधिक्षक**
शिक्का **क. लिपीक** **दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ ●

## थोडक्यात...

### शिवजयंतीपूर्वी पाटोदा शहरातील मांजरा नदी पुलावरील खड्डे बुजवावेत – शिवप्रेमींची मागणी



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरातील मांजरा नदी पुलावरील अवस्था अत्यंत दयनीय झाली असून पुलावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. येत्या शिवजयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. मात्र पुलावरील खड्ड्यांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून अपघाताचा धोका वाढला आहे. शिवजयंती निमित्त शहरातून मोठ्या प्रमाणावर मिरवणुका, दुचाकी रॅली व नागरिकांची ये–जा होणार आहे. अशा परिस्थितीत पुलावरील खड्डे तातडीने बुजवून रस्ता सुस्थितीत करावा, अशी मागणी शिवप्रेमी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.खड्ड्यांमुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत असून रात्रीच्या वेळी अपघात होण्याची शक्यता अधिक आहे. शिवप्रेमींची मागणी आहे की, संबंधित विभागाने तात्काळ दखल घेऊन शिवजयंतीपूर्वी पुलावरील खड्ड्यांची दुरुस्ती करावी, जेणेकरून उत्सव सुरळीत आणि सुरक्षित पार पडेल. याकडे प्रशासन लक्ष देणार का ? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### एसआरटी परिसरातील बीओआयचे एटीएम कायम बंद ; रुग्ण व नातेवाईकांना मोठा मनस्ताप, मशीन तात्काळ सुरू करण्याची नागरिकांची मागणी



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ (एसआरटी) रुग्णालय परिसरातील बँक ऑफ इंडिया (बीओआय) चे एटीएम मशीन गेल्या काही दिवसांपासून सतत बंद अवस्थेत असल्याने रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रुग्णालयात दाखल असलेल्या पेशंटच्या नातेवाईकांना औषधे, तपासण्या व इतर तातडीच्या खर्चासाठी रोख रकमेची आवश्यकता असते. मात्र एटीएम बंद असल्यामुळे त्यांना शहरात इतरत्र जाऊन पैसे काढावे लागत असून वेळ व पैशांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना याचा अधिक फटका बसत आहे. अनेक वेळा आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ रोख रक्कम आवश्यक असताना एटीएम बंद असल्याने नातेवाईकांची धावपळ होत आहे. त्यामुळे रुग्णसेवेवरही अप्रत्यक्ष परिणाम होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर बीओआय बँक प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन एटीएम मशीन नियमित सुरू ठेवावे व योग्य देखभाल करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### अमेरिकेसोबतचा करार शेतकऱ्यांच्या मुळावर : राजेंद्र आमटे
#### कापूस, सोयाबीन, दूध उत्पादकांना फटका ; करार रद्द करा अन्यथा शेतकरी हक्क मोर्चाचा इशारा



**बीड । प्रतिनिधी**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकरी हा देशाचा आधारस्तंभ आहे. मात्र केंद्र सरकारने अमेरिकेसोबत केलेला करार हा देशातील शेतकऱ्यांच्या हिताविरुद्ध असल्याचा आरोप शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आला आहे. शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताने अमेरिकेसमोर झुकण्याचे कारण काय ? अमेरिका त्यांच्या शेतकऱ्यांचे हित जपत आहे ; मग भारत सरकार देशातील शेतकऱ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष का करत आहे ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. अमेरिकेतील कापूस, सोयाबीन, दूध, गहू, मका आदी कृषी उत्पादनांवर शून्य टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लावून ती भारतात विक्रीसाठी खुली करणे, तर भारतीय शेतमाल अमेरिकेत निर्यात करताना १८ टक्के शुल्क आकारले जाणे, हा अन्यायकारक व्यवहार असल्याचा आरोप करण्यात आला. यामुळे देशांतर्गत पिकांचे भाव घसरून शेतकरी देशोधडीला लागेल, अशी भीती व्यक्त करण्यात आली. अमेरिकेतील शेतकऱ्यांना त्यांच्या सरकारकडून संरक्षण दिले जात असताना भारतीय शेतकऱ्यांच्या जिवावर हा करार करू नये. तात्काळ हा करार रद्द करण्यात यावा, अन्यथा शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. यावेळी माजी सैनिक अशोक येडे, डॉ. गणेश ढवळे, बाळासाहेब मोरे, कुलदीप करपे,गणेश नाईकवाडे, अर्जुन सोनवणे, राजू गायके, राजेंद्र वीर, खाजाभाई पठाण, माऊली शिंदे, दत्ता सुरवसे, सुहास जायभाये, मोहन गव्हाणे आदी उपस्थित होते.



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड या संस्थेच्यावतीने गाव बाभळ खुंट ता. जि. बीड येथे भारतीय कोकिळा सरोजिनी नायडू यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'एक झाड, एक जीवन' हे अभियान राबविण्यात आले. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने एक झाड लावून ते जगवावे, असा संदेश सर्वांना देण्यात आला. यावेळी उपस्थित संस्थेचे रोहन डोळस, सदस्य व गावकरी होते.*

# तुम्ही देवाचा एक रुपयाही खाल्ला नाही !
# मग ऑडीट नुसार बोगस खर्च दाखवण्याचे पाप कुणी केले ?

**● पुरुषोत्तम मंदिर विश्वस्तांनी १५ वर्षांचे ऑडिट एकाच वर्षी तयार करून बनावट खर्च केल्याचे ऊघड ?**
**● ट्रस्ट बरखास्तीची ग्रामस्थांची मागणी ; पुरुषोत्तमपुरी मंदिर ट्रस्टमधील कोट्यवधींचा घोटाळा ग्रामस्थांनी मांडला पुराव्यानिशी**

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी येथील भगवान पुरूषोत्तम मंदिर विश्वस्तांनी देवाचा एक रूपयाही खाल्ला नसल्याचा कांगोवा केला आहे परंतु मंदिर विश्वस्तांनी पंधरा वर्षांचे ऑडीट एकाच वर्षी तयार करून बनावट व बोगस खर्च दाखविण्याचे महापाप केल्याचे उघड झाले असुन ग्रामस्थांनी ट्रस्ट बरखास्तीची मागणी केली आहे. दरम्यान मंदिर ट्रस्टमध्ये झालेला कोट्यावधी रूपयांचा घोटाळा अर्जदार ग्रामस्थांनी मंदिरास विज कनेक्शन नसलेबाबतचे महावितरणचे पत्र, खासदार फंडातुन मिळालेले सभागृह मंदिर समितीने पुन्हा चौदा लाख रूपये खर्चुन बांधल्याचे देवस्थानच्या लेटरहेडवरील पत्र, देवस्थानच्या खात्यातील समिती सदस्यांनी स्वतःच्या नावे वटविलेले धनादेश अशा विवीध पुराव्यानिशी मांडला असुन कोट्यावधींच्या देणग्यांचा हिशोब कुठे आहे ? असा सवाल उपस्थित केला आहे तर वीज मिटर कनेक्शन २०२३ मधील मात्र ट्रस्टच्या ऑडिट अहवालात २००७ ते २०२२ दरम्यान ४३,२२१ रूपयांचे वीज बिल भरल्याचे उघड झाले आहे. खासदार फंडातील सभामंडपाचे काम पूर्ण असतांना परत बांधकामांसाठी चौदा लाख ९७ हजार ४८८ रूपये खर्च केल्याचे दाखविले आणि पोलिस स्टेशनला पाणी फिल्टर भेट मात्र भाविकांसाठी मात्र पाणी नसल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे मंदिरावरील ट्रस्ट बरखास्त करून प्रशासक नेमण्याची मागणी तिव्र झाली आहे.

**● खासदार फंडातील सभामंडप खर्च 'दुबार' दाखवला ?**

सन २००३–०४ मध्ये तत्कालीन खासदार जयसिंगराव गायकवाड यांच्या खासदार निधीतून ५ लाख रुपयांचा सभामंडप मंजूर होऊन पूर्ण झाल्याचा अधिकृत पुरावा उपलब्ध असतानाही, ट्रस्टने २०१९ च्या ऑडिट अहवालात सभामंडप बांधकामासाठी १४ लाख ९७ हजार ४८८ रुपये खर्च दाखवले असल्याचे उघड झाले आहे. एकाच सभामंडपावर दोनदा खर्च दाखवून निधीचा अपहार झाला का ? असा थेट सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

**● वीज मीटर नसताना लाखोंचा 'वीज बिल' खर्च ?**

महावितरण विभागाच्या पत्रानुसार मंदिराच्या नावाने वीज मीटर कनेक्शन २०२३ मध्ये देण्यात आले आहे. मात्र, ट्रस्टच्या ऑडिट अहवालात २००७ ते २०२२ दरम्यान ४३,२२१ रुपयांचे वीज बिल भरल्याची नोंद आहे. एवढेच नव्हे तर २०१४ ते २०२२ दरम्यान १ लाख ६६ हजार ५३२ रुपयांचा इलेक्ट्रिकल खर्च दाखवण्यात आला आहे. मीटरच नसताना वीज बिल आणि इलेक्ट्रिकल खर्च कसा ? हा 'कागदी खर्च' कोणी आणि कोणाच्या आशीर्वादाने दाखवला ? अशी चर्चा गावात रंगली आहे.

**● कोट्यवधींच्या देणग्यांचा हिशेब कुठे ?**

अधिक मास यात्रोत्सवात दररोज १ ते १.५ लाख भाविक दर्शनासाठी येतात. एका महिन्यात सुमारे १ ते १.५ कोटी रुपयांपर्यंत देणगी जमा होते, असा अंदाज आहे. २००७ ते २०२३ या काळात ५ ते ६ कोटी रुपयांहून अधिक देणग्या मिळाल्याचा दावा ग्रामस्थ करतात. मात्र ट्रस्टच्या खात्यावर अवघे ८० लाख रुपये शिल्लक असल्याची माहिती समोर येत आहे. उर्वरित रक्कम आणि दानातील सोने–चांदी, मौल्यवान वस्तू यांचा तपशील कुठे ? असा थेट सवाल उपस्थित झाला आहे.

**● ट्रस्टमध्ये मृत सदस्य, निवडणूक नाही,फेरनिवड नाही!**

ट्रस्टमधील तीन सदस्य मृत असूनही ९० दिवसांत नव्या सदस्यांची नियुक्ती नाही २००७ ते २०२५ पर्यंत निवडणूक अथवा फेरनिवड नाही देणगी पुस्तके छापताना धर्मादाय आयुक्तांची परवानगी नाही बँक खात्यातील रक्कम सदस्यांनी चेक द्वारे स्वतः च्या नावावर वटविल्याचे व रोख रक्कम काढल्याचे उघडकीस आले आहे. एकूणच ट्रस्टचा कारभार 'अनागोंदी' असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

**● ग्रामपंचायतीचा ठराव ; ट्रस्ट बरखास्तीची मागणी**

२०२२ मध्ये ग्रामपंचायतीने ट्रस्ट बरखास्त करून प्रशासक नेमण्याचा ठराव घेतला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी तक्रार सादर करण्यात आली असून, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आमदार प्रकाशदादा सोळंके, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडेही प्रत पाठविण्यात आली आहे. मंदिर विश्वस्त लग्न कार्यासाठी पैसे घेतात त्या पैशाचा हिशोब कुठे आहे याची पण चौकशी झाली पाहिजे. ग्रामस्थांचा इशारादेवाच्या नावाने आलेल्या पैशांचा हिशेब द्या, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.पुरुषोत्तमपुरीसारख्या पवित्र धार्मिक स्थळावर आर्थिक अनियमिततेचे आरोप होत असल्याने भाविकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. आता जिल्हा प्रशासन आणि धर्मादाय विभाग या गंभीर प्रकरणात काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**● एक रुपयाची ही अफरातफर नाही मग पुरावे खोटे आहेत का ?**

ग्रामस्थांनी ट्रस्ट बरखास्त करा अशी मागणी केल्यानंतर विश्वस्तांनी एक रुपयाची ही अफरातफर न केल्याचे सांगितले परंतु या विषयी सबळ पुरावे ग्रामस्थांकडे आहेत. हे सर्व पुरावे खोटे असतील तर अर्जदार व तक्रारदारांवर कारवाई करा असे तक्रारदारांनी सांगितले. या सर्व प्रकरणाची तक्रार ईडी कडे देऊन सखोल चौकशी ची मागणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

● मंदिर बांधकाम उत्कृष्ट व चांगल्या दर्जाचे असून प्रगती पथावर आहे. मंदिर बांधकाम गुत्तेदार फड हे अत्यंत चांगल्या प्रकारे व चांगल्या दर्जाचे उत्कृष्ट काम करत असून त्यांच्याबद्दल ग्रामस्थांची कसल्याही प्रकारची तक्रार नाही. त्यामुळे बांधकाम गुत्तेदारांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करू नये असेही यावेळी अर्जदार ग्रामस्थ शिवाजी गोळेकर, शरद सोळंके, प्रकाश थोरात, प्रमोद गोळेकर, उपसभापती श्रीहरी मोरे यांनी सांगितले.

## बीड शहरातील विविध धार्मिक स्थळावरील तसेच श्री सोमेश्वर मंदिर परिसरातील स्वच्छता मुख्याधिकारी यांनी करून घ्यावी: ॲड. गोविंद शिराळे

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील विविध धार्मिक स्थळावरील तसेच सर्वांच्या नवसाला पावणारे असे बार्शी रोडवरील असलेले श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह व तसेच विविध धार्मिक कार्यक्रम सध्या सुरू आहेत तसेच येणाऱ्या १५ तारखेला हिंदू संस्कृतीतील सर्वात मोठी श्री महाशिवरात्र हा उत्सव साजरा संपूर्ण जगभरामध्ये साजरा होत आहे याच पार्श्वभूमीवर जिल्हा बीड येथील श्रीक्षेत्र सोमेश्वर हनुमान मंदिर महादेव या ठिकाणी देखील दिल्या चार–पाच दिवसापासून चालू असलेला प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी नियमाप्रमाणे सुरू असलेला श्री अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता व श्री महादेव सोमेश्वर यांची महापूजा श्री महाशिवरात्रीच्या पर्व काळावर मोठ्या थाटामाटा हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे या परिसरातील सर्व जो बाजूच्या परिसराची स्वच्छता मोहीम नगरपालिकेने करावी व ठिकठिकाणी बीड शहरांमध्ये पथदिवे नाही त्या ठिकाणी त्वरित लाईट पथदिवे बसवण्यात



यावे तसेच संपूर्ण रस्त्याची स्वच्छता करण्यात यावी तसेच नगरपालिकेच्या वतीने त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात यावी असे विविध प्रश्न घेऊन स्वीकृत नगरसेवक एडवोकेट गोविंद शिराळे पाटील यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद यांना निवेदन दिले आहे तात्काळ सर्व बीड शहरातील विविध धार्मिक स्थळावरील स्वच्छता मोहीम नगरपालिकेने राबवावी असे आव्हान देखील यावेळी देव देश धर्म या साठी सातत्याने लढणारे सर्वांचे सुखदुःखामध्ये सातत्याने सहभागी होणारे नगरपालिकेचे नगरसेवक म्हणून नगरसेवकाचे कार्य काय असते ते आता आपल्या उत्कृष्ट कार्यातून दाखवून देणारे असे उत्कृष्ट वकील एडवोकेट गोविंद शिरोळे पाटील यांनी निवेदन दिले आहे आणि नगरपालिकेला तात्काळ बीड शहरातील विविध धार्मिक स्थळावरील तसेच श्री सोमेश्वर महादेव मंदिर परिसरातील स्वच्छता करण्यात यावी करण महाशिवरात्रीच्या अगोदर ही स्वच्छता व्हावी जेणेकरून येणाऱ्या भाविक भक्तांना कुठलाही त्रास होणार नाही याची दक्षता नगर परिषदेने घ्यावी असे या निवेदनात म्हटले आहे .

## भारतीय किसान संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा विशाल मोर्चा निघणार: बळीराम सोळंके

**गंगावाडी । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी भारतीय किसान संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर २३ फेब्रुवारी २०२६ रोजी भारतीय किसान संघाचे महाराष्ट्र प्रांताध्यक्ष बळीरामजी सोळंके यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा विशाल मोर्चा निघणार असल्याची माहिती जिल्हा अध्यक्ष तुकारामजी चोपडे यांनी दिली. यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात बळीराम सोळंके यांनी पुढे म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या संदर्भात वारंवार विनंती करूनही समस्या सुटत नसल्याने बीड जिल्ह्यातील शेतकरी वर्ग संतप्त झाला असून, त्यांनी पी एम व सीएम सन्मान निधीत दुप्पट वाढ करावी,सन २०२५ मध्ये खरीप हंगामात जाहीर केलेला १७५०० रुपयांचा विमा त्वरित द्यावा, खेड्यातील पांदण रस्त्यांची कामे तात्काळ सुरू करून येत्या खरीप हंगामापूर्वी पूर्ण करावीत,२०२५ च्या अतिवृष्टीने जिल्ह्यातील अनेक रस्ते खड्डेमय झाले ते तात्काळ बुजविण्यात यावेत, गाव जोड रस्ते, ग्रामीण मार्ग, प्रमुख जिल्हा मार्गाचे तात्काळ मजबुतीकरण करावे, सोलार पंप करिता ज्या शेतकऱ्यांनी शेतकरी हिस्सा भरलेला आहे त्यांचे सोलार पंप तात्काळ बसवावेत, सध्या पारंपारिक ऊर्जेचे कोटेशन देणे बंद केली आहे ते भरून देऊन तात्काळ कनेक्शन द्यावे

# तलवाडा येथे विजया एकादशीचे औचित्य साधत संत सावता महाराज मुर्तीचे दिमाखदार आगमन

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील मुस्लिम मोहल्ला, माळी गल्ली येथील माळी समाज बांधवांच्या भावना व संत विभुतिंच्या विषयी असलेली आस्था लक्षात घेऊन पुर्वी मुस्लिम समुदायच्या सवारी(ताजिया) बसवण्याची पारंपरिक असलेली जागा ताजिया हा सन तलवाडा येथे मोढीत निघाल्याने ती जागा संत सावता महाराजांच्या मंदिरासाठी दिली होती. तेव्हा पासुन छोटेखाणी स्वरूपात यथोचित महाराजांचे मंदिर या ठिकाणी मुस्लिम मोहल्ला व माळी गल्लीची शोभा वाढवतांना पहावयास मिळते. समाजातील होतकरु तरुणांनी वडिल मंडळीची परवानगी घेऊन नव्याने या ठिकाणी संत सावता महाराज मंदिराची उभारणी केली असुन पुढील शुक्रवारच्या दिवशी या ठिकाणी संत सावता महाराजांच्या



मुर्तीची नव्याने प्राण प्रतिष्ठा होणार असुन दिनांक १३/२/२०२६ विजया एकादशीचे औचित्य साधत छत्रपती शिवाजी महाराज चौकातुन भव्यदिव्य रथातुन संत सावता महाराजांच्या मूर्तीची वाजत गाजत मिरवणुकीने मुस्लिम मोहल्ला माळी गल्ली येथे आगमन झाले. पुढील शुक्रवारी यथोचितरित्या नव्याने बांधण्यात आलेल्या मंदिरात महाराजाची मूर्ति पारंपरिक पध्दतिने बसवण्यात येईल तरी सर्व स्तरातील राष्ट्रीय एकात्मता जोपासना–या बांधवांनी जास्तीच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीरंग तात्या व बाबुराव शिंगणे यांनी केले आहे.

● संत सावता माळी (१२५०–१२९५) हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील एक थोर कर्मयोगी संत होते. सोलापूर जिल्ह्यातील अरणभेंडी (माढा) येथे जन्मलेले सावता महाराज विठ्ठलभक्त होते. कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी या अभंगाद्वारे त्यांनी संसारात राहून, शेतीकाम (कर्म) करत ईश्वराची (विठ्ठलाची) प्राप्ती करता येते, असा संदेश दिला. ते संत नामदेव–ज्ञानदेवांचे समकालीन होते. संत सावता माळी यांचा जन्म इ.स. १२५० मध्ये सोलापूर जिल्ह्यातील अरण (अरणभेंडी) येथे झाला त्यांच्या वडीलाचे नाव परसूबा (पुरसोबा) आणि आईचे नाव नांगिताबाई होते ते वारकरी कुटुंबातील होते.

● सावता महाराजांच्या पत्नीचे नाव जनाई होते शेती हा त्यांचा पारंपरिक व्यवसाय होता. त्यांनी मळ्यात राबून, कर्तव्यकर्म करत, प्रेमाने विठ्ठलभक्ती केली कर्म हेच ईश्वरसेवा (कर्मयोग) हा त्यांचा मुख्य संदेश होता. संन्यास न घेता, संसार सांभाळून भक्ती करता येते, हे त्यांनी दाखवून दिले. त्यांनी साध्या, सोप्या मराठी भाषेत अभंग रचना केली. अरण येथे आषाढ वद्य चतुर्दशी, शके १२१७ (दि. १२ जुलै, १२९५) रोजी ते अनंतात विलीन झाले. त्यांच्या पावन स्मृतीनिमित्त आजही पंढरपूरच्या विठ्ठलाची पालखी वर्षातून एकदा अरण येथे येते. त्यांच्या स्मृतीस आदराने कर्मयोगी संत म्हणून स्मरले जाते, ज्यांनी कामातच विठोबा पाहिला.